THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस.

प्रेस नोट

दि. ३०/०७/२०२६

ठाणे येथे अवैध शस्त्रे विक्री करीता आलेल्या हद्दपार इसमास मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, ठाणे शहर कडुन केले जेरबंद

मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रफुल्ल जाधव यांना बातमी मिळाली की, ठाणे जिल्हयातुन हद्दपार केलेला इसम वाहिद खान हा ठाणे महानगरपालीका अग्निशमन केंद्र, सर्व्हीस रोड लगत, सार्वजनिक ठिकाणी रोडवर, रेतीबंदर, कळवा, ठाणे येथे ०२ अनधिकृत पिस्टल व काडतूसे विक्री करीता येणार आहे. सदर बातमीची खातरजमा करून योग्य ती कायदेशिर सापळा कारवाई करणे कामी सपोनि/ नितीन खाडे व पोलीस पथक यांना योग्य त्या सुचना देवुन मा. वरिष्ठांचे आदेशाने रवाना करण्यात आले होते.

सपोनि/ नितीन खाडे व पोलीस पथक यांनी बातमीचे अनुषंगाने बातमीच्या ठिकाणी दोन पंचासह जावून सापळा कारवाई करून इसम नामे वाहिद मंजुर खान वय २३ वर्षे, व्यवसाय– कॅटरर्समध्ये काम करणे, रा.ठी.– गल्ली नंबर ०४, रूम नंबर ०५, स्टार बेकरी जवळ, पाटीलपाडा, आंबिवली वेस्ट, कल्याण यास शिताफीने पकडले. त्यावेळी त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात एकुण ९२,६००/– रूपये किमंतीचे ०२ देशी बनावटीचे पिस्टल व ०४ जिवंत काडतूसे विक्री करण्याकरीता अथवा दखलपात्र गुन्हा करण्याचे इरादयाने बेकायदेशिररित्या विनापरवाना आपले कब्ज्यात बाळगले असताना मिळुन आला. तसेच त्यास ठाणे जिल्हा, मुंबईशहर, मुंबई उपनगरे या जिल्हयातुन १२ महिने हद्दपार केले असतानाही तो शासनाचे, न्यायालयाचे अगर पोलीसांचे पुर्व परवानगी शिवाय हद्दपार आदेशाचा भंग करून ठाणे शहरात वावरत असताना मिळुन आला. त्यामुळे आरोपीत याचे विरूध्द पो.ना./दिनकर श्रीपती सावंत, नेमणुक–मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी सरकारतर्फे दिलेले तक्रारी वरून कळवा पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ४४३/२०२६ भारतीय हत्यार अधिनियम १९५९ चे कलम ३, २५(१–ब)(अ), सह महाराष्ट्र पो.का.क. ३७(१),१३५, १४२ नुसार दिनांक २९/०७/२०२६ रोजी गुन्हा दाखल करून मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा ठाणे शहर कडुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

सदरची कारवाई मा.पो.उप आयुक्त, गुन्हे, श्री. अमरसिंह जाधव, सहा. पोलीस आयुक्त, शोध–२, गुन्हे शाखा, श्री. विनय घोरपडे, यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा ठाणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/प्रफुल्ल जाधव, सपोनि/ नितीन खाडे, सपोनि/प्रकाश दिनकर, पोउनि/सुरेश माळोदे, म. सपोउनि/अक्षदा साळवी, पोहवा/संजय दळवी, पोहवा/दादासाहेब पाटील, पोना/अंकुश शिंदे, पोना/दिनकर सावंत,पोशि/मयुर शिरसाट, पोशि/योगेश क्षिरसागर, चापोशि/विकास चेमटे यांनी केली आहे.

---------- 0000000----------

Scanned with OKEN Scanner